सदरक्षणाय खलनिग्रहणाय

महाराष्ट्र शासन
**पोलीस विभाग**
वार्ताहर कक्ष,
पोलीस आयुक्त, यांचे कार्यालय,
डॉ. डी. एन. रोड, मुंबई-४००००१.

दूरध्वनी क्र. २२६२०३३२
Email I.D. – pressroom.mum@mahapolice.gov.in

---

जा.क्र. ६०३/वार्ता.कक्ष/२०२१ दिनांक :- १८/११/२०२१

# —: प्रेस नोट :—

परिमंडळ ३ अंतर्गत आग्रीपाडा पोलीस ठाणे हद्दीत दिनांक १४/१०/२०२१ रोजी सकाळी ०५.४५वा. दरम्यान आग्रीपाडा पोलीस ठाण्याच्या बाजूला डी मार्ट जवळील फुटपाथवर एक महिला पोटात दुखते आहे म्हणून रडत असल्याचे एका झाडूवाली महिलेने आग्रीपाडा पोलीस ठाणे येथे येऊन प्रथम चौकशी पथक यांना सदर प्रकार सांगितला असता तेथील अधिकारी पोलीस उपनिरीक्षक शिरसाट यांनी मोबाईल ५ निर्भया पथक यांना सदर ठिकाणी पाठविले.

अग्रीपाडा मोबाईल ५ निर्भया पथक यांनी घटनस्थळी तात्काळ पोहोचले असता सदर ठिकाणी एक अनोळखी महिला गरोदर असून ती एका बाळाला जन्म देत होती बाळ सदर फुटपाथवर चिखलात नुकतेच बाहेर आलेले होते महिला ही मतिमंद आहे हे विचारपूस मध्ये लक्षात आले बाळ रडत होते, चिखलात पडलेले बाळ पूर्णपणे थंड पडून थरथरत होते आग्रीपाडा मोबाईल पाच वर नेमणूक असलेल्या महिला अंमलदार महिला पोलीस शिपाई क्रमांक ११२४०९/निकम यांनी बाळाला त्यांच्या ओढणीत गुंडाळून त्याच्या अर्धवट अडकलेल्या नाळ सह सदर बाळाला हातात पकडून त्या बाईला धीर दिला सदर महिला फुटपाथवरील असल्याने तिच्या अंगावर देखील कपडे नव्हते तिला तात्काळ साडी मागवून अंगावर झाकण्यात आले मोबाईल पाच वर चालक असलेल्या पोलीस शिपाई घुगे, पोलीस पोलीस हवालदार पानसरे यांनी तात्काळ १०८ वर फोन करून ॲम्बुलन्स ची मागणी केली ॲम्बुलन्स च्या मदतीने आणि अग्रीपाडा मोबाइल ५ च्या मदतीने त्या महिलेला आणि बाळाला नायर हॉस्पिटल येथे नेण्यात आले.

सदर बाळ आणि महिला सुखरूप असून नायर हॉस्पिटल येथे उपचाराकरिता दाखल (ॲडमिट) आहेत. आग्रीपाडा पोलीस ठाणे मुंबई मधील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी चांगली कामगिरी करून प्रशंसनीय कामगिरी केली, जनमाणसातील मुंबई पोलीसांची प्रतिमा उंचविण्याचे सर्वोत्कृष्ट कार्य केले आहे.

यांनी केलेल्या या प्रशंसनीय व उल्लेखनीय कामगिरीबद्दल दि. १६/११/२०२१ रोजी १६.३० वा. मा. श्री विश्वास नांगरे पाटील, पोलीस सह आयुक्त (का व सु), बृहन्मुंबई यांनी, वाय.एम.सी सभागृह, आग्रीपाडा, मुंबई येथे पोलीस उप आयुक्त परिमंडळ ३, मुंबई अंतर्गत पोलीस अधिकारी व अंमलदार यांना विशेष पारितोषिक व प्रशस्तीपत्र देऊन गौरव केलेला आहे. सदर वेळी मा. श्री. ज्ञानेश्वर चव्हाण, अपर पोलीस आयुक्त, मध्य प्रादेशिक विभाग, मा.श्री.परमजीत सिंग दहिया, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, यांचे उपस्थितीत सोहळा पार पडला.

(चैतन्या एस्.)
पोलीस उप आयुक्त (अभियान),
जनसंपर्क अधिकारी,
पोलीस आयुक्त कार्यालय, मंबई

Scanned with CamScanner




Scanned with CamScanner



Scanned with CamScanner



Scanned with CamScanner